महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ 27688
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
दिनांक : 13 NOV 2017.

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना कंपनीमार्फत कायम स्वरूपी ओळखपत्र देण्याबाबत.

----

महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना, सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक व इतर देयकाबाबत व कामानिमित्त कंपनीच्या कार्यालयात जावे लागते. तसेच ज्येष्ठ नागरीक म्हणून रेल्वे, बँका, रूग्णालयातील औषधोपचार, महाराष्ट्रातील कंपनीच्या विश्रामगृहात थांबण्यासाठी व इतर कारणास्तव उपयोग करण्यासाठी तसेच त्यांना महावितरण कंपनीचे सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी म्हणून समाजात सन्मानाची वागणूक मिळण्याच्यादृष्टीकोनातून त्यांना कायमस्वरूपी ओळखपत्र देण्याची बाब कंपनी प्रशासनाच्या विचाराधीन होती.

२. आता, मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त होणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना, खालील अटींच्या अधीन राहून कायमस्वरूपी ओळखपत्र देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

क) अधिकारी / कर्मचारी ज्या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत ते पद नमूद करून संबंधीत प्रशासकीय कार्यालय / विभागाने त्यांना फोटोसह कायमस्वरूपी ओळखपत्र देण्याची कार्यवाही करावी.

ख) पदनाम नमूद करताना त्याआधी "सेवानिवृत्त" असा ठळक उल्लेख न चुकता करावा.

ग) सदर ओळखपत्र देण्यापूर्वी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कंपनीच्या सेवेत असतानाचे ओळखपत्र संबंधीत कार्यालयाकडे जमा केलेले आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

३. मुख्य अभियंता(स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, बांद्रा, यांनी शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र. १८३/ १८ (र. व का.) दिनांक २३.०६.२०१७ अन्वये पारीत केल्यानुसार, कंपनीतून सेवानिवृत्त होणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या ओळखपत्राचा नमुना तयार करून, विहीत नमुन्यातील अशी कोरी ओळखपत्रे सर्व प्रादेशिक कार्यालये आणि परिमंडल कार्यालये यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून द्यावीत.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

13/11

**( सचिन ढोले )**
**कार्यकारी संचालक(मासं)**